# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

## विद्याशाखा : मानव विज्ञान (Faculty – Humanities)

## दोन वर्षीय चार सत्रांचा पदव्युत्तर अभ्यासक्रम – रा.शै.धो. आ.२०२३ (NEPv23)

## अभ्यासक्रम : वाङ्मय पारंगत (मराठी) / एम. ए. (मराठी) (Programme - M.A. Marathi)

## विभाग अ (Part – A)

### अभ्यासक्रमाची निष्पत्ती (POs) :

१. जीवन व्यवहाराच्या विविध क्षेत्रांतील आंतरसंबंधांचे ज्ञान प्राप्त होईल. तसेच त्यातील गुंतागुंत समजून घेऊन वैश्विक मानवतेच्या व्यापक पटावर जीवनाचे आकलन करून घेण्याची दृष्टी प्राप्त होईल.

२. व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवनातील बदलत्या परिस्थितीचे आकलन करून त्यात विवेकपूर्ण विचार आणि व्यवहार करण्यासाठीची विचारप्रवणता आणि कृतिशीलता निर्माण होईल.

३. प्रतिष्ठापूर्ण आणि आत्मसन्मानाने स्वावलंबी जीवन जगण्याची व इतरांनाही त्या दृष्टीने सहकार्य करण्याची इच्छाशक्ती अंगी बाणवता येईल.

४. संशोधक वृत्ती, जिज्ञासूपणा आणि ज्ञानलालसा वाढीस लागून ज्ञानाचे व्यावहारिक उपयोजन करता येईल.

५. चिकित्सक आणि तुलनात्मक अभ्यास दृष्टीचा विकास होईल. त्यामुळे जीवनातील सैद्धांतिक आणि प्रायोगिक पातळीवरील समस्यांचे कालसापेक्ष भान निर्माण होऊन सर्जनशील पर्याय देण्याची प्रक्रिया विकसित होईल.

६. भाषाभान जागृत होऊन मानवी सभ्येतेतील भाषेचे प्रयोजन आणि बदलत्या काळातील त्याचे उपयोजन करता येईल. शिवाय बहुभाषिक आणि बहुसांस्कृतिक लौकिक प्राप्त करून घेता येईल.

७. विचार आणि भावपोषण योग्य पद्धतीने झाल्यामुळे आत्मविश्वासाने जीवन जगता येईल.

८. माहिती व तंत्रज्ञानाची कौशल्ये विकसित करून रोजगार सक्षम होता येईल.

### अभ्यासक्रमाची विशिष्ट निष्पत्ती (PSOs) :

१. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या मानव विज्ञान शाखेतील एम.ए. मराठी अभ्यासक्रमाच्या अध्यायनामुळे विद्यार्थ्यांची साहित्य ही संकल्पना सुस्पष्ट होऊन त्याची अभिरुची वृद्धिंगत होईल.

२. समकालीन बदलत्या संदर्भात मराठी समाज, भाषा, इतिहास, साहित्य आणि संस्कृतीचे चिकित्सक आकलन होईल.

३. भाषा आणि साहित्याचा सामाजिक तसेच कलात्मक पातळीवर अभ्यास केल्याने विवेकपूर्ण तर्कसंगतता आणि कारुण्यपूर्ण संवेदनशीलता निर्माण होऊन साहित्याचे व्यावहारिक उपयोजन करता येईल.

४. चिकित्सा, तुलना आणि समीक्षा करण्याची दृष्टी विकसित झाल्यामुळे विविध साहित्य प्रकारांतील लेखनाचे योग्य अध्ययन, संशोधन आणि सर्जनशील निर्मिती करता येईल.

५. भाषेच्या तात्त्विक अभ्यासासह प्रतिष्ठापूर्ण रोजगार प्राप्तीसाठीचे भाषिक कौशल्य प्राप्त होतील.

**अभ्यासक्रमाची रोजगारविषयक क्षमता (Employability Potential of the Programme)** :

मराठी विषयात एम. ए. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर रोजगाराच्या विविध संधी प्राप्त होतील. त्यातील काही महत्त्वाच्या संधींची यादी खाली दिली आहे :

१. शिक्षक या पदांच्या नोकरीसाठी विद्यार्थी पात्र ठरेल.
२. प्राध्यापक होण्याची पूर्वअट तो पूर्ण करू शकेल.
३. राज्य व केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची तयारी करण्यासाठी सदर अभ्यासक्रम उपयुक्त ठरेल.
४. विविध सरकारी कार्यालये, एल.आय.सी., बँक, सरकारी सेवा आदी कार्यक्षेत्रांत रोजगार उपलब्ध होतील.
५. पत्रकारिता, दूरचित्रवाणी, आकाशवाणी आदी क्षेत्रांत लेखन आणि निवेदन असे क्षेत्र निवडता येईल.
६. भाषांतर / अनुवाद क्षेत्रात मोठी संधी मिळेल.
७. भाषाविज्ञान, ग्रंथालयशास्त्र, सर्जनशील लेखन, नाट्यक्षेत्र इत्यादी क्षेत्रांमध्ये काम करता येईल.
८. मुद्रित शोधन, संपादकीय व प्रकाशन व्यवसाय आदी क्षेत्रांत रोजगार मिळू शकेल.
९. प्रवक्ता, निवेदक, भाष्यकार, सूत्रसंचालक, व्याख्याता म्हणून ओळख निर्माण करता येईल.
१०. दाखले, उदाहरणे, कोट्या, विनोद, म्हणी, वाक्प्रचार, कविता, गझल यांचा प्रभावीपणे वापर करून उत्तम वक्ता होता येईल.
११. भाषिक कौशल्ये व सर्जनशीलतेचा विकास होऊन लेखक म्हणून प्रस्थापित होता येईल.
१२. संशोधक, विश्लेषक, तुलनाकार, टीकाकार, भाष्यकार म्हणून कार्य करता येईल.
१३. कंटेंट रायटर, संपादक, वृत्त निवेदक, सोशल मिडिया मॅनेजर इत्यादी क्षेत्रांत रोजगार मिळवू शकेल.
१४. ऑनलाईन ट्यूटर प्रशिक्षक, स्पर्धापरीक्षा मार्गदर्शक, युट्यूबवरून व्याकरणाच्या अध्यापनाचे व्हिडिओ प्रसारित करून रोजगार मिळवता येईल.
१५. चित्रपट व मालिका पटकथालेखन, माहितीपत्राचे लेखन, ब्लॉग रायटर, गीतकार म्हणून लौकिक व रोजगार प्राप्त करता येईल.
१६. माहितीपर लेखन, अहवाल लेखन, वृतांत व इतिवृत्त लेखन, माहिती पुस्तिका, माहिती पत्रक, स्मरणिका, गौरविका, मानपत्र, पत्र, पत्रिका आदींचे लेखन करता येईल.
१७. विविध समाजमाध्यमांतील जाहिरात लेखनाची कौशल्ये विकसित होतील.
१८. संकेतस्थळांना हाताळण्याची व माहितीच्या विश्वासार्हतेची शहानिशा करता येईल.

# विभाग ब (Part – B)

## वाङ्मय पारंगत (मराठी) / एम. ए. (मराठी) अभ्यासक्रम (NEPv23)

## एम. ए. (मराठी) : सत्र पहिले

| अक्र. | अभ्यासपत्रिका प्रकार | अभ्यासपत्रिका संकेतांक | अभ्यासपत्रिका शीर्षक | तास | श्रेयांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | **RM and IPR** | **MS11** | संशोधन पद्धती आणि बौद्धिक संपदा अधिकार | ६० | ४ |
| २ | **DSC-I.1** | **MS12** | मराठी साहित्याची सांस्कृतिक व सामाजिक पार्श्वभूमी (आरंभ ते १८१८) | ६० | ४ |
| ३ | **DSC-II.1** | **MS13** | साहित्यविचार | ६० | ४ |
| ४ | **DSC-III.1** | **MS14** | लोकसाहित्य | ६० | ४ |
| ५ | **DSE-I A** | **MS15** | संतसाहित्य | ६० | ४ |
| | **DSE-I B** | **MS16** | महानुभाव साहित्य | | |
| | **DSE-I C** | **MS17** | विशेष वाङ्मयप्रकार कथा | | |
| | **DSE-I D** | **MS18** | विशेष वाङ्यप्रकार कादंबरी | | |
| | **DSE-I E** | **MS19** | विशेष वाङ्मयप्रकार नाटक | | |
| ६ | **DSC-III.1 – Tutorial** | **MS110** | प्रशिक्षण व कार्यानुभव | ३० | २ |
| ७ | **On Job Training, Internship/ Apprenticeship, Field projects** | **MOJT1** | अभ्यासक्रमाशी संबंधित सेवाधीन प्रशिक्षण, सेवानुभव, क्षेत्रप्रकल्प | १२० | -- |
| | | | | | २२ |

सूचना :

१) **DSC** अभ्यासपत्रिका अनिवार्य राहील.

२) **DSE** अभ्यासपत्रिका ऐच्छिक स्वरूपाची असून गट ५ मधील कोणतीही एक अभ्यासपत्रिका निवडावी लागेल.

३) **DSC-III.1 - Tutorial :**
अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षण व कार्यानुभव पूर्ण करावे लागेल.

४) सत्र १ आणि सत्र २ सुट्टीच्या कालावधीत एकूण १२० तास अभ्यासक्रमाशी संबंधित सेवाधीन प्रशिक्षण, सेवानुभव, क्षेत्रप्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक राहील. हे कार्य पूर्ण झाल्यानंतर त्याचे ४ श्रेयांक विद्यार्थ्यास मिळतील.

## १) **अभ्यासपत्रिका** (MS11)
## संशोधन पद्धती आणि बौद्धिक संपदा अधिकार

**अभ्यासपत्रिकेची निष्पत्ती (COs)**

१. संशोधनाचा अर्थ, स्वरूप आणि महत्त्व स्पष्ट होईल.
२. संशोधनाच्या विविध पद्धती आणि संशोधन समस्येनुसार त्यातील विशिष्ट पद्धतीचे उपयोजन करता येईल .
३. संशोधन पद्धतीचे आकलन झाल्यामुळे संशोधनात अभिरूची आणि गती प्राप्त होईल.
४. सभोवतालाकडे व प्राप्त माहितीकडे चिकित्सक, विश्लेषणात्मक व तुलनात्मक दृष्टीने पाहण्याची वृत्ती विकसित होईल.
५. पीएच.डी.साठी आणि संशोधन संस्थांच्या प्रकल्पांसाठी या ज्ञानाचा फायदा होईल.
६. बौद्धिक संपदा अधिकाराचे महत्त्व लक्षात येईल आणि त्यामुळे स्वत:च्या निर्मिती, उत्पादन, कृती यांबाबतच्या हक्कांबाबत विद्यार्थी जागरूक होईल.

| अक्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक | नेमलेले तास |
|---|---|---|
| १ | **संशोधन : संकल्पनात्मक परिचय**<br>१.१ संशोधन : अर्थ, स्वरूप, व्याप्ती व उद्दिष्ट्ये.<br>१.२ संशोधनाचे प्रकार (गुणात्मक संशोधन आणि संख्यात्मक संशोधन) आणि संशोधनाच्या पद्धती. | १२ तास |
| २ | **संशोधनातील पायऱ्या**<br>२.१ संशोधन विषयाची निवड / समस्या सूत्रण<br>२.२ पूर्वसाहित्याचा आढावा<br>२.३ परिकल्पना/गृहीतकृत्य<br>२.४ संशोधन आराखडा<br>२.५ माहिती संकलन, सर्वेक्षण, प्रश्नावली आणि मुलाखती इ.<br>२.६ माहिती विश्लेषण<br>२.७ अहवाल लेखन | १२ तास |
| ३ | **संशोधन साधने**<br>३.१ संदर्भ ग्रंथ<br>३.२ नियतकालिके<br>३.३ शासकीय संस्थात्मक अहवाल<br>३.४ शोधप्रबंध व लघुप्रबंध<br>३.५ इ-स्रोत | १२ तास |

| | | |
|---|---|---|
| ४ | **संशोधकासाठी आवश्यक गुण व संशोधन कार्यातील पथ्ये**<br>**गुण :**<br>**४.१** जिज्ञासा, व्युत्पन्नता, प्रज्ञा, संयम.<br>४.२ चिकित्सक दृष्टी, संवेदनशीलता आणि कल्पकता.<br>४.३ संशोधन पूरक भाषिक ज्ञान व कौशल्य.<br>**पथ्ये :**<br>४.४ विषयाचे अवधान आणि पूर्वज्ञान, वस्तुनिष्ठता, कालभान, व्यवहारभान, पूर्वग्रहरहितता, मूल्यविवेक.<br>४.५ संशोधनविषयक परंपरांचे भान.<br>४.६ संशोधनाची सामाजिक उपयुक्तता (प्रादेशिक, राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय) | १२ तास |
| ५ | **बौद्धिक संपदा अधिकार :**<br>**५.१** बौद्धिक संपदा : संकल्पना, परिचय<br>५.२ बौद्धिक संपदा अधिकार : स्वरूप आणि प्रकार<br>५.३ बौद्धिक संपदा अधिकार आणि भारत<br>५.४ कॉपीराईट आणि कॉपीराईटसंबंधी अधिकार | १२ तास |

संदर्भग्रंथ :


१) वाङ्मय संज्ञा-संकल्पना कोश, (टीप: संशोधन) संपा.: प्रभा गणोरकर, वसंत आबाजी डहाके आणि इतर, ग. रा. भटकळ फाऊंडेशन, मुंबई. प्र. आ.: डिसेंबर २००१/१९२३, पुनर्मुद्रण :२०१३/१९३५.

२) मराठी वाङ्मयकोश खंड चौथा समीक्षा-संज्ञा (टीप : संशोधन), समन्वयक संपा.: विजया राजाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.

३) भारतीय समाजविज्ञान कोश, खंड ६ - पूरवणी खंड, (टीप: संशोधन) संपा.: स. मा. गर्गे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. प्र. आ.: ऑगस्ट २०१७.

४) संशोधन : पदंधती, प्रक्रिया व अंतरंग, डॉ. दु. का. संत, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे.

५) शोधनिबंधाची लेखनपद्धती, स. गं. मालशे (सुधारित आवृत्ती संपादन मिलिंद मालशे), लोकवाङ्मय गृह, मुंबई, सहावी आवृत्ती, २०१४.

६) भाषा व साहित्य संशोधन (खंड १, २, ३), संपा. वसंत जोशी, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.

७) मराठी संशोधन विद्या, उषा मा. देशमुख, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९४.

८) संशोधन सिद्धांत आणि पद्धती, सदा कऱ्हाडे, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९९७.

९) साहित्यसंशोधन : वाटा आणि वळणे, डॉ. सुधाकर शेलार, अक्षरवाङ्मय प्रकाशन, पुणे, २०१९.

१०) सामाजिक संशोधन : पद्धती, शास्त्र व तंत्रे, प्रदीप आगलावे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

११) संशोधन प्रकल्पाची लेखनपद्धती, प्रा. डॉ. प्रशांत देशमुख, डॉ. दीपक शिरसाट, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्र. आ. नोव्हें., २०२२.

१२) बौद्धिक संपदा (Intellectual Property) (टीप) : मराठी विश्वकोश, शैला देसाई.

१३) बौद्धिक संपदा अधिकार, डॉ. वि. म. गोविलकर, डायमंड पब्लिकेशन.

१४) बौद्धिक संपदा हक्क : स्वरूप आणि समस्या, डॉ. जयश्री नेमाडे, प्रशांत पब्लिकेशन, २०१९.

१५) कॉपीराइट, कमलेश जैन, राजकमल प्रकाशन प्रा. लि., नई दिल्ली, २००८.

१६) Intellectual Property Rights in India, V. K. Ahuja, Volume 1 & Volume 2.

## २) अभ्यासपत्रिका (MS12)
## मराठी साहित्याची सांस्कृतिक व सामाजिक पार्श्वभूमी (आरंभ ते १८१८)

**अभ्यासपत्रिकेची निष्पत्ती (COs)**

१. साहित्याच्या सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमीचा विद्यार्थ्यांचा पाया पक्का होईल.
२. साहित्याविषयीची आकलनक्षमता वाढेल.
३. युपीएससी, एमपीएससी, नेट-सेट व इतर स्पर्धात्मक परीक्षांची तयारी होईल.
४. वृत्तपत्रीय लेखन-संपादन करण्यासाठी अभ्यासाचा उपयोग होईल.
५. अध्यापनाच्या व्यवसायात पदार्पण करायचे असल्यास ज्ञानाच्या कक्षा अधिक रुंदावतील.

| अक्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक | नेमलेले तास |
|---|---|---|
| १ | अ) साहित्य आणि समाज : अन्योन्यसंबंध<br>ब) यादवकालीन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय स्थितीच्या पार्श्वभूमीवर महानुभाव संप्रदायाचा उद्गम, विकास व तत्त्वज्ञान. महानुभाव संप्रदाय बंदिस्त होण्याची कारणे. | १५ तास |
| २ | अ) वारकरी संप्रदायाच्या उदयकालाची महाराष्ट्रातील सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक स्थिती आणि वारकरी संप्रदायाच्या उदयाची कारणे.<br>ब) संत नामदेव-संत ज्ञानदेव आणि संतांची मांदियांळी, संतांचे सामाजिक कार्य. त्याला पूरक साहित्यनिर्मिती. | १५ तास |
| ३ | अ) ज्ञानाचा एका : नाथकालीन समाज आणि संत एकनाथांची साहित्यनिर्मिती<br>ब) शिवकाल : संत तुकाराम आणि संत रामदास यांचे कार्य | १५ तास |

| | | |
|---|---|---|
| ४ | अ) शिवकाल व पेशवेकालीन सामाजिक व राजकीय स्थिती. शाहिरी वाङ्मयाची प्रेरणा व स्वरूप.<br>ब) उत्तर पेशवाई : लावणी वाङ्मयाचा ऱ्हासकाल | १५ तास |
| टीप - | या अभ्यासपत्रिकेत मराठी साहित्याच्या सांस्कृतिक व सामाजिक पार्श्वभूमीचा अभ्यास करण्यात येईल. नेमलेल्या कालखंडातील कोणत्याही विशिष्ट कलाकृतीचा व लेखकाचा अभ्यास आणि त्यावर प्रश्न अपेक्षित नसून, त्या त्या कालखंडातील सांस्कृतिक व सामाजिक घडामोडी आणि त्यांचा तत्कालीन वाङ्मयीन विश्वावर झालेला परिणाम याचा अभ्यास अपेक्षित आहे. | |

संदर्भग्रंथ :


१) मराठी संतांचे सामाजिक कार्य, वि. भि. कोलते, लोकवाङ्मय गृह, मुंबई

२) मराठी लावणी (प्रस्तावना), म. वा. धोंड, मौज प्रकाशन, मुंबई.

३) संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, गं. बा. सरदार.

४) महाराष्ट्रीय सन्त मंडळाचे ऐतिहासिक कार्य, बा. रं. सुंठणकर, अजित एजन्सी, बेळगाव, १९४८.


## ३) अभ्यासपत्रिका (MS13)

## साहित्यविचार

**अभ्यासपत्रिकेची निष्पत्ती (COs)**

१. ललित साहित्य व इतर लेखन (वैचारिक साहित्य, इतिहास, तत्त्वज्ञान) यांमधील साम्यभेदांचे सखोल आकलन होईल.
२. साहित्यकृतीला प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित होऊन साहित्यविषयक संवेदनशीलता अधिक सूक्ष्म आणि व्यापक होईल.
३. साहित्यकृतीकडे अधिक चिकित्सक दृष्टीने पाहता येऊन आपला प्रतिसाद तर्कशुद्ध रीतीने मांडण्याची क्षमता निर्माण होईल.
४. साहित्यकृतीचे वर्णन, विश्लेषण व मूल्यमापन करता येईल.
५. साहित्यकृतीवर रसग्रहणात्मक लेख लिहिता येईल.
६. साहित्य व जीवन यांच्या परस्पर संबंधांची चिकित्सा करता येईल.

| अक्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक | नेमलेले तास |
|---|---|---|
| १ | साहित्यविचार : संकल्पना, स्वरूप, वैशिष्ट्ये आणि परंपरा | १५ तास |
| २ | भारतीय साहित्यविचार : शब्दशक्ती, ध्वनिविचार, रसविचार. | १५ तास |
| ३ | पाश्चात्त्य साहित्यविचार : अनुकृतीचा सिद्धांत, शोकांतिकेचे घटक, विरेचनाचा सिद्धांत. | १५ तास |
| ४ | मर्ढेकर-मुक्तिबोधांचा साहित्यविचार : सौंदर्यभावना, काव्यातील नवीनता, लयतत्त्व, वाङ्मयीन महात्मता, रस आणि लयतत्त्वाला नकार, मानुषता. | १५ तास |

आधारग्रंथ :

१) भारतीय साहित्यशास्त्र, ग. त्र्यं. देशपांडे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
२) काव्यशास्त्रप्रदीप, स. रा. गाडगीळ, व्हीनस प्रकाशन, पुणे.
३) सौंदर्य आणि साहित्य, बा. सी. मर्ढेकर, मौज प्रकाशन, मुंबई.
४) सृष्टी, 'सौंदर्य' आणि साहित्यमूल्य, शरच्चंद्र मुक्तिबोध, लोकवाङ्मय गृह, मुंबई.
५) ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र, गो. वि. करंदीकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
६) साहित्यविचार, अरविंद वामन कुलकर्णी, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

पूरक ग्रंथ :

१) प्राचीन काव्यशास्त्र, र. पं. कंगले, मौज प्रकाशन मुंबई.
२) भारतीय साहित्यविचार, लीला गोविलकर, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
३) साहित्यविचार, संपादक दत्तात्रय पुंडे, स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
४) साहित्यशास्त्र : स्वरूप आणि समस्या, वसंत पाटणकर, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
५) साहित्याचे तत्त्वज्ञान, वि. ना. ढवळे, कॉटिनेन्टल प्रकाशन, पुणे.
६) पाश्चात्त्य साहित्यविचार, ब. लु. सोनार, प्रज्ञा प्रकाशन, अमळनेर.
७) साहित्यविचार आणि सौंदर्यशास्त्र, रा. भा. पाटणकर, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ आणि मौज प्रकाशन, मुंबई.
८) कला आणि मानव, बा. सी. मर्ढेकर (अनुवाद रा. भी. जोशी), मौज प्रकाशन, मुंबई.
९) मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र : एक पुन:स्थापना, द. भि. कुलकर्णी, अमेय प्रकाशन, नागपूर.
१०) मार्क्सवादी साहित्यविचार, के. रं. शिरवाडकर.
११) अर्वाचीन कवींचा काव्यविचार, डॉ. हेमंत खडके, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
१२) शरच्चंद्र मुक्तिबोध : शतकोत्तर आकलन, संपादक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, डॉ. अजय देशपांडे, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

## ४) अभ्यासपत्रिका (MS14)

## लोकसाहित्य

**अभ्यासपत्रिकेची निष्पत्ती (COs)**

१) लोकसाहित्य म्हणजे काय, ते सांगता येईल.
२) लोकसाहित्यातील घटकांचा वस्तुनिष्ठ अभ्यास करता येईल.
३) लोकव्यवहाराला प्रभावित करणारे घटक सांगता येतील.
४) लोकसाहित्यातील घटकांचे मूल्यमापन करता येईल.
५) समाजहितकारक लोकतत्त्वे लोकांपर्यंत पोचवता येतील.
६) कालबाह्य प्रथा-परंपरांची लोकांना जाणीव करून देता येईल.

| अ.क्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक | नेमलेले तास |
|---|---|---|
| १ | लोकसाहित्य - संकल्पना, स्वरूप व व्याप्ती | १५ तास |
| २ | लोकसाहित्य - अभ्यासपद्धती<br>२.१. मानववंशशास्त्रीय अभ्यासपद्धती<br>२.२. मानसशास्त्रीय अभ्यासपद्धती | १५ तास |
| ३ | मिथक व लोकतत्त्वे - संकल्पना व स्वरूप | १५ तास |
| ४ | लोकरंगभूमी आणि आधुनिक रंगभूमी - परंपरा आणि वेगळेपण | १५ तास |

संदर्भग्रंथ :


१) लोकसाहित्याची रूपरेखा, दुर्गा भागवत, वरदा बुक्स, पुणे.
२) लोकसाहित्याचे स्वरूप, डॉ. प्रभाकर मांडे.
३) लोकसाहित्याचे अंत:प्रवाह, डॉ. प्रभाकर मांडे.
४) लोकरंगभूमी, डॉ. प्रभाकर मांडे.
५) मराठी लोककथा, संपा. डॉ. मधुकर वाकोडे, साहित्य अकादेमी, नवी दिल्ली.
६) पुराणकथा आणि वास्तवता, दामोदर धर्मानंद कोसंबी(अनुवाद वसंत तुळपुळे), लोकवाङ्मय गृह, मुंबई, सहावी आवृत्ती २०१७.
७) लोकसंस्कृतीचे उपासक, डॉ. रा. चिं. ढेरे.
८) लोकसंस्कृतीची क्षितिजे, डॉ. रा. चिं. ढेरे.
९) संतसाहित्य आणि लोकसाहित्य, डॉ. रा. चिं. ढेरे.
१०) लोकप्रतिभा आणि लोकतत्त्वे, डॉ. मधुकर वाकोडे.
११) वैदर्भीय लोकसाहित्य, डॉ. भाऊ मांडवकर, सेवा प्रकाशन, अमरावती.
१२) वऱ्हाडी लोकगीते, पांडुरंग श्रावण गोरे, सेवा प्रकाशन, अमरावती.
१३) आदिवासी लोकसाहित्य : शोध आणि बोध संपा. डॉ. संजय लोहकरे
१४) लोकसाहित्याची संशोधनपद्धती, डॉ. अनिल सहस्रबुद्धे.
१५) संत, लोक आणि अभिजन, डॉ. रा. चिं. ढेरे.
१६) लोकसाहित्य : आकलन आणि आस्वाद, डॉ. शंकर राऊत.
१७) शोधयात्रा रंगभूमीची, विश्वनाथ शिंदे.
१८) लोकसाहित्याचे स्वतंत्र अभ्यासक्षेत्र, डॉ. गंगाधर मोरजे.
१९) लोकसाहित्य मीमांसा, विश्वनाथ शिंदे.
२०) लोकसंस्कृती : स्वरूप आणि विशेष, डॉ. द. ता. भोसले, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
२१) लोकजीवन आणि लोकसंस्कृती, संपा. द. ता. भोसले, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
२२) लोकसाहित्य शोध आणि समीक्षा, रा. चिं. ढेरे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
२३) लोकसाहित्य : उद्गम आणि विकास, शरद व्यवहारे, विश्वभारती प्रकाशन, नागपूर.
२४) लोकसाहित्य चर्चा आणि चिंतन, संपा. राजेंद्र हावरे, आधार पब्लिकेशन्स, अमरावती, २०१५.

## ५) अभ्यासपत्रिका (MS15)

## संतसाहित्य

**अभ्यासपत्रिकेची निष्पत्ती (COs)**

१. मध्ययुगीन काळातील मराठी साहित्यातील समृद्ध अशा वाङ्मयीन परंपरेची विद्यार्थ्यांना ओळख होईल.
२. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत रामदास यांच्या वाङ्मयीन आणि सांस्कृतिक कार्याचा विद्यार्थ्यांना परिचय होईल.
३. मध्ययुगीन कालखंडातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक परिस्थितीचे विद्यार्थ्यांना आकलन होईल.
४. संत वाङ्मयातील मानवतेची शिकवण, नीतिमूल्ये यांचा विद्यार्थ्यांच्या मनावर संस्कार होईल व त्यातून त्यांना जीवन जगण्यासाठी दिशा मिळेल.
५. संतांच्या लेखनशैलीचा अभ्यास झाल्याने विद्यार्थी उत्तम साहित्यनिर्मिती करू शकतील.

| अक्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक | नेमलेले तास |
|---|---|---|
| १ | संतांचे साहित्य : प्रेरणा, स्वरूप व विशेष<br>मध्ययुगीन संत साहित्याची सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक पार्श्वभूमी आणि मराठी संतांची कामगिरी | १५ तास |
| २ | संत ज्ञानदेव<br>श्रीज्ञानेश्वरी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, या ग्रंथातील **अध्याय दुसरा.** | १५ तास |
| ३ | संत नामदेव<br>नामदेवगाथा, ह. श्री. शेणोलीकर, साहित्य अकादेमी, नवी दिल्ली, यमधील **प्रकरण ६ ते १०**. | १५ तास |
| ४ | संत सेना न्हावी<br>श्रीसकलसंतगाथा, संपादक प्रा. र. रा. गोसावी, सारथी प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती २०१६, यामधील **अभंग क्र. १ ते १११** (पान ९२९ ते ९४०). | १५ तास |

संदर्भग्रंथ :

१) पाच संतकवी, शं. गो. तुळपुळे
२) महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण, श्री. व्यं. केतकर
३) मराठी संतांचे सामाजिक कार्य, डॉ. विष्णू भिकाजी कोलते (अनुवाद सुमती रमाकांत कोलते), लोकवाङ्मय गृह, मुंबई, २०१४.
४) प्राचीन मराठी साहित्य संशोधन, वि. भि. कोलते, श्री लेखन वाचन भांडार, पुणे, १९६८
५) साक्षात्कारी संत तुकाराम, शं. दा. पेंडसे
६) एकनाथदर्शन, गं बा. सरदार
७) श्री रामदास स्वामींचे प्रपंचविज्ञान, श्री. म. माटे, कॉटिनेन्टल प्रकाशन, पुणे.

८) ज्ञानदेव आणि नामदेव : शं. दा. पेंडसे
९) ज्ञानेश्वरांची साहित्यदृष्टी आणि सृष्टी, गो. म. कुलकर्णी
१०) संत नामदेव : समाजशास्त्रीय अभ्यास, डॉ. श्यामसुंदर मिरजकर, नाग-नालंदा प्रकाशन, विशालनगर, जि. सांगली.
११) एकनाथ : वाङ्मय आणि कार्य, न. र. फाटक
१२) तुकाराम, भालचंद्र नेमाडे (भाषांतर चंद्रकांत पाटील), साकेत प्रकाशन, द्वितीयावृत्ती १९९७.
१३) मराठी साहित्याचे आदिबंध, उषा माधव देशमुख
१४) संतसाहित्य समीक्षेचे बीजप्रवाह, डॉ. सतीश बडवे, गुरुकुल प्रतिष्ठान, पुणे.
१५) संत कवी आणि कवयित्री : एक अनुबंध, डॉ. सुहासिनी इर्लेकर, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
१६) महाराष्ट्रातील संतांचे विचारधन, डॉ. प्रमोद गारोडे, अनघा पब्लिकेशन, परतवाडा.
१७) उपेक्षित संतांचा विद्रोह, डॉ. प्रमोद गारोडे, देवयानी प्रकाशन, ऐरोली, नवी मुंबई.
१८) संत साहित्याची मौलिकता, प्रा. डॉ. गजानन लोहवे, सुधीर प्रकाशन, वर्धा.


## ६) अभ्यासपत्रिका (MS16)

## महानुभाव साहित्य

**अभ्यासपत्रिकेची निष्पत्ती (COs)**

१. मराठी साहित्यातील समृद्ध अशा वाङ्मयीन परंपरेची विद्यार्थ्यांना ओळख होईल.
२. मध्ययुगीन कालखंडातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक परिस्थितीचे विद्यार्थ्यांना ज्ञान होईल.
३. श्री चक्रधर, श्री गोविंदप्रभू यांच्या क्रांतिकार्याचा विद्यार्थ्यांना परिचय होईल.
४. महानुभावीय गद्यवाङ्मयातून सत्य, अहिंसा, समता, बंधुता, दयाभाव इत्यादी नीतिमूल्यांची शिकवण विद्यार्थ्यांना मिळेल आणि त्याचा उपयोग जीवन उत्तम रितीने जगण्यासाठी होईल.
५. महानुभावीय साहित्याच्या अभ्यासाने विद्यार्थी उत्तम साहित्यनिर्मिती करू शकतील.

| अक्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक | नेमलेले तास |
|---|---|---|
| १ | महानुभाव साहित्य : प्रेरणा, स्वरूप व विशेष<br>मध्ययुगीन संत साहित्य सामाजिक, सांस्कृतिक धार्मिक पार्श्वभूमी | १५ तास |
| २ | लीळाचरित्र दर्शन, डॉ. शिवशंकर उपासे, डॉ. जयसिंग कळके, राहूल प्रकाशन, कोल्हापूर. | १५ तास |
| ३ | श्री गोविंदप्रभू चरित्र, डॉ. विष्णू भिकाजी कोलते , अरुण प्रकाशन, मलकापूर, जि. बुलडाणा, सुधारित आवृत्ती १९८२. | १५ तास |
| ४ | महदंबेचे धवळे, डॉ. सुहासिनी इर्लेकर, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीय आवृत्ती १९९९. | १५ तास |

संदर्भग्रंथ :


१) महानुभाव पंथ आणि त्यांचे वाङ्मय, शं. गो. तुळपुळे, व्हीनस प्रकाशन, पुणे.
२) महानुभाव तत्त्वज्ञान, वि. भि. कोलते.
३) श्रीचक्रधरदर्शन, संपा. डॉ. वि. भि. कोलते, शिक्षण व सेवा योजना विभाग, महाराष्ट्र शासन, १९८२.
४) महानुभावांचे चरित्रग्रंथ, य. खु. देशपांडे.
५) लीळाचरित्र : एक अध्ययन, व. दि. कुलकर्णी.
६) महानुभाव आणि वारकरी साहित्य, प्रा. सुग्राम पुल्ले, सूर्यमुद्रा प्रकाशन, नांदेड, २०१६.
७) सार्थ लीळाचरित्र, संपा. प्रा. पुरुषोत्तम नागपुरे, लीळाचरित्र गौरव निधी समिती, नागपूर.
८) लीळाचरित्रातील लोकजीवन, डॉ. ममता महल्ले-इंगोले, देवयानी प्रकाशन, ऐरोली, नवी मुंबई.


## ७) अभ्यासपत्रिका (MS17)

## विशेष वाङ्मयप्रकार कथा

**अभ्यासपत्रिकेची निष्पत्ती (COs)**

१. कथेचे स्वरूप , संकल्पना,घटक व प्रकार स्पष्टपणे समजून घेता येतील.
२. कथेचे वर्गीकरण करून विश्लेषण व टीकात्मक मांडणी करता येईल.
३. कथेच्या आकृतिबंधाचे वैविध्य शोधता येतील.
४. कथालेखकांच्या प्रेरणांचा शोध घेऊन कथासमीक्षा करण्याची दिशा मिळेल.
५. नेमलेल्या साहित्यकृतींच्या आधारे कथाघटकांचे समग्र आकलन होऊन कथालेखनाची प्रेरणा मिळेल.

| अक्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक | नेमलेले तास |
|---|---|---|
| १ | कथा : संकल्पना, स्वरूप आणि वैशिष्ट्ये | १५ तास |
| २ | नेमलेल्या साहित्यकृतींचा अभ्यास -<br>समाधी आणि इतर सहा कथा, दिवाकर कृष्ण, देशमुख अँड कंपनी, चौथी आवृत्ती १९९४ | १५ तास |
| ३ | अंगारमाती, भास्कर चंदनशीव, साकेत प्रकाशन, औरंगाबाद. | १५ तास |
| ४ | जावे तिच्या वंशा, प्रिया तेंडुलकर, राजहंस प्रकाशन, तिसरी आवृत्ती फेब्रुवारी २००४ | १५ तास |

संदर्भग्रंथ :


१) वाड्.मयीन संज्ञा - संकल्पना कोश, संपा. प्रभा गणोरकर व इतर, ग. रा. भटकळ फाउण्डेशन, मुंबई, २००१.

२) मराठी वाड्.मयकोश, खंड चौथा समीक्षा संज्ञा, समन्वयक संपादक विजया राजाध्यक्ष, म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.
३) मराठी कथा : उद्‌गम आणि विकास, इंदुमती शेवडे, सोमय्या पब्लिकेशन्स प्रा. लि. मुंबई.
४) कथा : संकल्पना आणि समीक्षा, सुधा जोशी, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
५) मराठी कथेची स्थितिगती, डॉ अंजली सोमण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, नोव्हेंबर,२०२१
६) मराठी कथा : प्रवृत्ती आणि प्रवाह, डॉ. रा. गो. चवरे, सुयश प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती २००३.
७) मराठीतील कथनरूपे, वसंत आबाजी डहाके, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

## ८) अभ्यासपत्रिका (MS18)

## विशेष वाङ्मयप्रकार कादंबरी

**अभ्यासपत्रिकेची निष्पत्ती (COs)**

१. कादंबरीचे स्वरूप, संकल्पना, घटक व प्रकार समजून घेता येतील.
२. अभ्यासक्रमात असलेल्या कादंब-यांचे वर्गीकरण करून त्यातील आशयसूत्रांचे घटकनिहाय विश्लेषण करता येईल.
३. नेमलेल्या कांदब-यांमधील पात्रांच्या नात्यांची गुंतागुंत आणि भावनिक द्वंद्वांचा शोध घेता येईल.
४. अभ्यासक्रमातील कादंबरीकारांच्या प्रेरणांचा आणि दृष्टिकोनांचा वेध घेता येईल.
५. विविध समीक्षापद्धतींचे उपयोजन करून नेमलेल्या कादंब-यांची समीक्षा करता येईल.
६. कादंबरीचे स्वरूप व घटक समजून घेतल्यामुळे जीवनव्यवहाराच्या केंद्रस्थानी असणा-या मनुष्य व इतर घटकांवर आधारित कादंबरी लेखनाचा प्रयत्न करता येईल.

| अक्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक | नेमलेले तास |
|---|---|---|
| १ | कादंबरी : संकल्पना, स्वरूप,घटक आणि प्रकार. | १५ तास |
| २ | नेमलेल्या साहित्यकृतींचा अभ्यास -<br>ब्राह्मणकन्या, डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९३०, पुनर्मुद्रण २००५. | १५ तास |
| ३ | बनगरवाडी, व्यंकटेश माडगूळकर, मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९५५. | १५ तास |
| ४ | सावित्री, पु. शि. रेगे, मौज प्रकाशन, मुंबई, चतुर्थ आवृत्ती १९९९. | १५ तास |

संदर्भग्रंथ

१) वाड्.मयीन संज्ञा-संकल्पना कोश, संपा. प्रभा गणोरकर व इतर, ग. रा. भटकळ फाउण्डेशन, मुंबई, २००१.

२) मराठी वाड्.मयकोश खंड चौथा समीक्षा संज्ञा, समन्वयक संपादक विजया राजाध्यक्ष, म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.
३) मराठी कादंबरी तत्त्व आणि सिद्धांत, गोमटेश्वर पाटील, दर्या प्रकाशन, पुणे.
४) मराठी वाड्.मयाचा इतिहास : खंड सातवा, भाग : ३, संपा. रा .ग .जाधव, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, आवृत्ती दुसरी २०१०.
५) मराठी साहित्य: प्रेरणा व स्वरूप, संपा. गो. मा. पवार, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
६) स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीची वाटचाल (१९५० ते २०००), डॉ. शंकर विभुते, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २०१० .
७) मराठी कादंबरी : समाजशास्त्रीय समीक्षा, डॉ रवींद्र ठाकूर, दिलीपराज प्रकाशन, २००७.


## ९) अभ्यासपत्रिका (MS19)

## विशेष वाङ्मयप्रकार नाटक

**अभ्यासपत्रिकेची निष्पत्ती (COs)**

१. नाटक या वाङ्मयप्रकाराची संकल्पना विद्यार्थ्यांना स्पष्ट होईल.
२. या अभ्यासपत्रिकेच्या अभ्यासाने नाटकाचे आकलन, आस्वाद आणि मूल्यमापन करण्याची क्षमता विकसित होईल.
३. नाटकाद्वारे विविध मानवी प्रवृत्तींचे दर्शन घडून मानवी जीवनाविषयीची समृद्ध जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल.
४. नाटकनिर्मितीच्या घटकांचा अभ्यास झाल्याने नाटकनिर्मिती करण्यास विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल.
५. नाट्यक्षेत्रात कारकीर्द करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना ही अभ्यासपत्रिका उपयोगी ठरू शकेल.

| अक्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक | नेमलेले तास |
|---|---|---|
| १ | नाटक : संकल्पना, स्वरूप, घटक आणि प्रकार | १५ तास |
| २ | नेमलेल्या साहित्यकृतींचा अभ्यास -<br>नटसम्राट, वि. वा. शिरवाडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. | १५ तास |
| ३ | गांधी-आंबेडकर, प्रेमानंद गज्वी, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई. | १५ तास |
| ४ | देवबाभळी, प्राजक्त देशमुख, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. | १५ तास |

संदर्भग्रंथ :


१) वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोश, संपा. प्रभा गणोरकर व इतर, ग. रा. भटकळ फाउण्डेशन, मुंबई, २००१.

२) मराठी वाङ्मयकोश खंड चौथा समीक्षा-संज्ञा, समन्वयक संपादक विजया राजाध्यक्ष, म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.

३) नाटक : रंगाविष्कार आणि रंगास्वाद, डॉ. व. दि. कुलकर्णी, पद्‌मगंधा प्रकाशन, पुणे, २००१.

४) नाटक : स्वरूप आणि समीक्षा, डॉ. द. भि. कुलकर्णी, पद्‌मगंधा प्रकाशन, पुणे, २०१०.

५) ना नाटकातला, राजीव नाईक, पद्‌मगंधा प्रकाशन, पुणे, २०१२.

६) भारतीय प्रयोगकलांचा परिचय व इतिहास : नाट्य, संपा. डॉ. राजीव नाईक, ललित कला केंद्र पुणे विद्यापीठ व लोकवाङ्मय गृह, मुंबई, २०१०.


## १०) अभ्यासपत्रिका (MS110)

**DSC-III.1 -Tutorial** प्रशिक्षण व कार्यानुभव

| अक्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक (अध्यापन / प्रशिक्षण) | कृती | नेमलेले तास |
|---|---|---|---|
| १ | मिथक | विशिष्ट परिसरातील मिथके नोंदविणे. | १५ तास |
| २ | लोकरंगभूमी | विशिष्ट परिसरातील लोकरंगभूमीचे तपशील नोंदविणे. उदा. दंडार, खम्म नाट्य. | १५ तास |

अंतर्गत परीक्षा स्वरूप

| अक्र. | लेखी - स्वाध्याय / प्रकल्प / निबंध | मौखिक परीक्षा / सादरीकरण | एकूण गुण |
|---|---|---|---|
| १ | २५ | २५ | ५० |

❄ ❄ ❄

## लेखी परीक्षा - प्रश्नपत्रिकेचे स्वरूप

| | |
|---|---|
| **लेखी परीक्षा - प्रश्नपत्रिकेचे स्वरूप आणि अंतर्गत परीक्षेचे स्वरूप** (सत्र १) | ❖ प्रत्येक अभ्यासपत्रिका १०० गुणांसाठी असेल.<br>❖ अभ्यासपत्रिकेच्या १०० गुणांचे विभाजन पुढीलप्रमाणे राहील<br>अ) ७० गुणांसाठी लेखी परीक्षा<br>ब) ३० गुणांसाठी अंतर्गत परीक्षा<br>❖ लेखी परीक्षेचे स्वरूप - प्रश्नपत्रिका एकूण ७० गुण<br>अ) दीर्घोत्तरी प्रश्न - ५६ गुण<br>(१४ गुणांचा एक याप्रमाणे ४ दीर्घोत्तरी प्रश्न (पर्यायासह) राहतील.)<br>ब) वस्तुनिष्ठ प्रश्न - १४ गुण<br>(२ गुणांचा एक याप्रमाणे ७ वस्तुनिष्ठ प्रश्न)<br>❖ अंतर्गत परीक्षेचे स्वरूप - एकूण गुण ३०<br>१) अंतर्गत परीक्षेसाठी विषयानुरूप शोधनिबंध / लघुशोधप्रकल्प / कोशनोंद-लेखन किंवा विकिपिडियासाठी लेखन / सूचीनिर्मिती / ब्लॉगनिर्मिती / मुलाखत / सर्वेक्षण इत्यादी प्रकारचे कार्य सत्रकालावधीत पूर्ण करणे अपेक्षित राहील. - गुण १५<br>२) विषयानुरूप मौखिक परीक्षा / सादरीकरण आवश्यक राहील. - गुण १५ |

❄ ❄ ❄

## वाङ्मय पारंगत (मराठी) / एम. ए. (मराठी) अभ्यासक्रम (NEPv23)

## एम. ए. (मराठी) : सत्र दुसरे

| अक्र. | अभ्यासपत्रिका प्रकार | अभ्यासपत्रिका संकेतांक | अभ्यासपत्रिका शीर्षक | तास | श्रेयांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | **DSC-I.2** | **MS21** | मराठी साहित्याची सांस्कृतिक व सामाजिक पार्श्वभूमी (१८१८ ते २०००) | ६० | ४ |
| २ | **DSC-II.2** | **MS22** | समीक्षाविचार | ६० | ४ |
| ३ | **DSC-III.2** | **MS23** | लोकसाहित्य | ६० | ४ |
| ४ | **DSE-II A** | **MS24** | विशेष वाङ्मयप्रकार कविता | ६० | ४ |
| | **DSE-II B** | **MS25** | विशेष वाङ्यप्रकार चरित्र-आत्मचरित्र-आत्मकथन | | |
| | **DSE-II C** | **MS26** | विशेष वाङ्मयप्रकार ललित गद्य | | |
| | **DSE-II D** | **MS27** | विनोदी साहित्य | | |
| | **DSE-II E** | **MS28** | प्रवासवर्णन | | |
| ५ | **DSC-II.2 - Tutorial** | **MS29** | प्रशिक्षण व कार्यानुभव | ३० | २ |
| ६ | **On Job Training, Internship/ Apprenticeship, Field projects** | **MOJT2** | अभ्यासक्रमाशी संबंधित सेवाधीन प्रशिक्षण, सेवानुभव, क्षेत्रप्रकल्प | १२० | ४ |
| | | | | | २२ |

सूचना :

१) **DSC** अभ्यासपत्रिका अनिवार्य राहील.

२) **DSE** अभ्यासपत्रिका ऐच्छिक स्वरूपाची असून गट ५ मधील कोणतीही एक अभ्यासपत्रिका निवडावी लागेल.

३) **DSC-II.2 - Tutorial -**
अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षण व कार्यानुभव पूर्ण करावे लागेल.

४) सत्र १ आणि सत्र २ सुट्टीच्या कालावधीत एकूण १२० तास अभ्यासक्रमाशी संबंधित सेवाधीन प्रशिक्षण, सेवानुभव, क्षेत्रप्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक राहील. हे कार्य पूर्ण झाल्यानंतर त्याचे ४ श्रेयांक विद्यार्थ्यास मिळतील.

## १) अभ्यासपत्रिका (MS21)

## मराठी साहित्याची सांस्कृतिक व सामाजिक पार्श्वभूमी (१८१८ ते १९६०)

**अभ्यासपत्रिकेची निष्पत्ती (COs)**

१. साहित्याच्या सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमीचा विद्यार्थ्यांचा पाया पक्का होईल.
२. साहित्याविषयीची आकलनक्षमता वाढेल.
३. युपीएससी, एमपीएससी, नेट-सेट व इतर स्पर्धात्मक परीक्षांची तयारी होईल.
४. वृत्तपत्रीय लेखन-संपादन करण्यासाठी अभ्यासाचा उपयोग होईल.
५. अध्यापनाच्या व्यवसायात पदार्पण करायचे असल्यास ज्ञानाच्या कक्षा अधिक रुंदावतील.

| अक्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक | नेमलेले तास |
|---|---|---|
| १ | अ) पेशवाईचे पतन आणि इंग्रजांचे राज्य. सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय घुसळण.<br>ब) ब्रिटिशांनी आखलेले शैक्षणिक धोरण, त्याचा महाराष्ट्रीय धोरणावर झालेला परिणाम. | १५ तास |
| २ | अ) महादेव गोविंद रानडे (समन्वयवाद), विष्णूशास्त्री चिपळूणकर (परंपरावाद), महात्मा ज्योतिबा फुले (सुधारणावाद), गोपाळ गणेश आगरकर (बुद्धिप्रामाण्यवाद) आणि लोकमान्य टिळक (राष्ट्रवाद) या सर्वांनी केलेली महाराष्ट्राची वैचारिक जडणघडण.<br>ब) वेदोक्त प्रकरण व त्यातून झालेली सामाजिक घुसळण व सुधारणा. | १५ तास |
| ३. | अ) गांधीयुगाचा प्रारंभ व मराठी साहित्यावर पडलेला प्रभाव<br>ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीचा मराठी साहित्यावरील परिणाम. चवदार तळ्याचा सत्याग्रह, मनुस्मृतिदहन, काळाराम मंदिर आंदोलन, अंबादेवी मंदिर आंदोलन यांचा प्रभाव. | १५ तास |
| ४. | अ) स्वातंत्र्य आंदोलनाचा मराठी साहित्यावरील परिणाम.<br>ब) स्वातंत्र्य व स्वातंत्र्योत्तर रक्तपात, दंगली यांचा मराठी साहित्यनिर्मितीवर झालेला परिणाम. | १५ तास |
| | टीप -<br>या अभ्यासपत्रिकेत मराठी साहित्याच्या सांस्कृतिक व सामाजिक पा पार्श्वभूमीचा अभ्यास करण्यात येईल. नेमलेल्या कालखंडातील कोणत्याही विशिष्ट कलाकृतीचा व लेखकाचा अभ्यास आणि त्यावर प्रश्न अपेक्षित नसून, त्या त्या कालखंडातील सांस्कृतिक व सामाजिक घडामोडी आणि त्याचा तत्कालीन वाङ्मयीन विश्वावर झालेला परिणाम याचा अभ्यास अपेक्षित आहे. | |

संदर्भग्रंथ :

१) मराठी साहित्य, इतिहास आणि संस्कृती, वसंत आबाजी डहाके, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
२) आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी, गो. म. कुलकर्णी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९४.
३) अर्वाचीन मराठी साहित्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी, सदा कऱ्हाडे, लोकवाङ्मय गृह, मुंबई.
४) जोतिपर्व, नागनाथ कोत्तापल्ले, सायन पब्लिकेशन्स प्रा. लि., पुणे.
५) आगरकरांचे सांस्कृतिक आणि साहित्यविषयक विचार, प्रा. तानाजी ठोंबरे, लोकवाङ्मय गृह, मुंबई.
६) राजर्षी शाहू महाराज : वसा आणि वारसा, ॲड. गोविंद पानसरे, लोकवाङ्मय गृह, मुंबई.
७) डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय चळवळी, कृष्णा मेणसे, लोकवाङ्मय गृह, मुंबई.
८) मोहरा महाराष्ट्राचा, संपादक डॉ. रमेश अंधारे, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २०२२.

## २) अभ्यासपत्रिका (MS22)

## समीक्षाविचार

**अभ्यासपत्रिकेची निष्पत्ती (COs)**

१. समीक्षा ही संकल्पना स्पष्ट होऊन तिची उद्दिष्टे, महत्त्व आणि अपरिहार्यता यांचे आकलन वाढेल.
२. समीक्षाप्रक्रियेतील पायऱ्यांचे पृथःकरण करता येईल.
३. विविध वाङ्मयीन वादांमधील साम्यभेदांची तुलना करता येईल व त्यांच्या ऐतिहासिक कार्याचे मूल्यमापन करता येईल.
४. साहित्याचे आकलन, वर्णन, आस्वादन, विश्लेषण आणि मूल्यमापन करण्याची क्षमता वाढून विद्यार्थ्यांची अभिरुची विकसित होईल.
५. गांधीवाद, आंबेडकरवाद आणि देशीवाद यांच्या मुळाशी असलेल्या मूल्यव्यवस्थेचा शोध घेऊन त्यावर टिपण लिहिता येईल.
६. एखाद्या वाङ्मयकृतीवर समीक्षणात्मक लेख लिहिता येईल.

| अक्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक | नेमलेले तास |
|---|---|---|
| १ | समीक्षा : संकल्पना, स्वरूप, उद्दिष्टे, महत्त्व, समीक्षकाचे कार्य व क्षमता, समीक्षेची अपरिहार्यता, समीक्षाप्रक्रिया. | १५ तास |
| २ | समीक्षेचे दृष्टिकोन : आस्वादक समीक्षा, समाजशास्त्रीय समीक्षा, चरित्रात्मक समीक्षा. | १५ तास |
| ३ | वाङ्मयीन वाद : संकल्पना, स्वरूप, वैशिष्ट्ये, महत्त्व,<br>अभिजातवाद, सौंदर्यवाद, वास्तववाद. | १५ तास |
| ४ | मराठी समीक्षेची वाटचाल : गांधीवाद, आंबेडकरवाद आणि देशीवादाच्या संदर्भात. | १५ तास |

संदर्भग्रंथ :


१) साहित्यसमीक्षा : स्वरूप आणि विकास, ना. वा. गोडबोले गं. ना. जोगळेकर, व्हीनस प्रकाशन, पुणे
२) टीकाविवेक, श्री. के. क्षीरसागर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
३) नवसमीक्षा : काही विचारप्रवाह, संपा. गो. म. कुलकर्णी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
४) साहित्याचे तत्वज्ञान, वि. ना. ढवळे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
५) पाश्चात्य साहित्यविचार, ब. लु. सोनार, प्रज्ञा प्रकाशन, अमळनेर.
६) आधुनिक समीक्षा-सिद्धांत, मिलिंद मालशे, अशोक जोशी, मौज प्रकाशन, मुंबई, २०१३.
७) समीक्षापद्धती : सिद्धांत आणि उपयोजन, संपा. रवींद्र ठाकूर, नंदकुमार मोरे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
८) मराठी टीका, संपा. वसंत दावतर, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९६६.
९) उपयोजित समीक्षा : लक्षणे आणि पडताळणी, डॉ. अ. वा. कुलकर्णी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००३.
१०) साहित्यशास्त्र : स्वरूप आणि समस्या, वसंत पाटणकर, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
११) समीक्षेतील नव्या संकल्पना, संपा. मनोहर जाधव, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.
१२) आदिबंधात्मक समीक्षा, डॉ. म. सु. पाटील, नीहारा प्रकाशन, पुणे.
१३) मानसशास्त्रीय समीक्षा, अ. वा. कुलकर्णी.
१४) मराठी समीक्षेची वाटचाल, गो. म. कुलकर्णी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
१५) साहित्यविचार, दि. के. बेडेकर, लोकवाङ्मय गृह, मुंबई.
१६) गांधीवाद आणि आधुनिक मराठी साहित्य, संपादक द. दि. पुंडे, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९५.
१७) देशीवाद, अशोक बाबर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
१८) आंबेडकरी विचार आणि साहित्य, अविनाश डोळस, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००९.


## ३) अभ्यासपत्रिका (MS23)

## लोकसाहित्य

**अभ्यासपत्रिकेची निष्पत्ती (COs)**

१. लोकवाङ्मय म्हणजे काय, ते सांगता येईल.
२. लोकवाङ्मयाच्या मौखिक परंपरेचा वस्तुनिष्ठ अभ्यास करता येईल.
३. लोकव्यवहाराला प्रभावित करणाऱ्या परंपरा सांगता येतील.
४. लोकवाङ्मयाचे व लोककलांचे मूल्यमापन करता येईल.
५. लोककलांच्या माध्यमातून लोकप्रबोधन करता येईल.

| अक्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक | नेमलेले तास |
|---|---|---|
| १ | लोककथा - व्याख्या व स्वरूप<br>विशेष अभ्यास- १) दैवतकथा २) हास्यकथा | १५ तास |
| २ | लोकगीते - व्याख्या व स्वरूप<br>विशेष अभ्यास - १) स्त्री-गीते २) श्रम-गीते | १५ तास |
| ३ | लोकदैवते - परंपरा व स्वरूप<br>विधिनाट्य - संकल्पना व स्वरूप<br>विशेष अभ्यास - १) जागरण | १५ तास |
| ४ | लोककला - व्याख्या व स्वरूप<br>विशेष अभ्यास - १) कीर्तन | १५ तास |

संदर्भग्रंथ :


१) लोकसाहित्याची रूपरेखा, दुर्गा भागवत.

२) लोकसाहित्याचे स्वरूप, ड़ॉ. प्रभाकर मांडे.

३) लोकसाहित्याचे अंत:प्रवाह, डॉ. प्रभाकर मांडे.

४) लोकरंगभूमी, डॉ. प्रभाकर मांडे.

५) मराठी लोककथा, संपा. डॉ. मधुकर वाकोडे, साहित्य अकादेमी, नवी दिल्ली.

६) पुराणकथा आणि वास्तवता, दामोदर धर्मानंद कोसंबी(अनुवाद वसंत तुळपुळे), लोकवाङ्मय गृह, मुंबई, सहावी आवृत्ती २०१७

७) लोकसंस्कृतीचे उपासक, डॉ. रा. चिं. ढेरे.

८) लोकसंस्कृतीची क्षितिजे, डॉ. रा. चिं. ढेरे.

९) संतसाहित्य आणि लोकसाहित्य, डॉ. रा. चिं. ढेरे.

१०) लोकप्रतिभा आणि लोकतत्त्वे, डॉ. मधुकर वाकोडे.

११) आदिवासी लोकसाहित्य : शोध आणि बोध संपा. डॉ. संजय लोहकरे.

१२) लोकसाहित्याची संशोधनपद्धती, डॉ. अनिल सहस्रबुद्धे.

१३) संत, लोक आणि अभिजन, डॉ. रा. चिं. ढेरे.

१४) लोकसाहित्य : आकलन आणि आस्वाद, डॉ. शंकर राऊत.

१५) शोधयात्रा रंगभूमीची, विश्वनाथ शिंदे.

१६) लोकसाहित्याचे स्वतंत्र अभ्यासक्षेत्र, डॉ. गंगाधर मोरजे.

१७) लोकसाहित्य मीमांसा, विश्वनाथ शिंदे.

१८) मराठी व्रतकथा : संकलन व समीक्षा, डॉ. संतोष चतुर, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

१९) भुलाबाईच्या गाण्यातील स्त्रीजीवन, डॉ. ममता महल्ले (इंगोले), पिंपळापुरे बुक डिस्ट्रिब्युटर्स, नागपूर.

## ४) अभ्यासपत्रिका (MS24)

## विशेष वाङ्मयप्रकार कविता

**अभ्यासपत्रिकेची निष्पत्ती (COs)**

१. काव्यविषयक जाणीव, आस्वादक्षमता समृद्ध होईल.
२. स्पर्धा परीक्षा अभ्यासक्रमातील कविता या वाङ्मयप्रकाराच्या अभ्यासाकरिता उपयुक्त ठरेल.
३. व्यावसायिकरित्या संपादक म्हणून काम करायचे असेल तर कवितेची समज समृद्ध होईल.
४. अध्यापनाचा व्यवसाय स्वीकारायचा असेल तर कवितेचा अभ्यास उपयोगी ठरेल.
५. कवितालेखन करायचे असेल तर काव्यविषयक जाणिवा समृद्ध होतील.

| अक्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक | नेमलेले तास |
|---|---|---|
| १ | कविता : संकल्पना, स्वरूप आणि वैशिष्ट्ये | १५ तास |
| २ | नेमलेल्या साहित्यकृतींचा अभ्यास -<br>निवडक नारायण सुर्वे, लोकवाङ्मय गृह, मुंबई. | १५ तास |
| ३ | पिंडपात, सुखदेव ढाणके, काव्याग्रह प्रकाशन, वाशिम. | १५ तास |
| ४ | तत्पूर्वी, दासू वैद्य, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.<br>(पान क्र. १ ते ५० पर्यंतच्या कविता) | १५ तास |

संदर्भग्रंथ :

१) वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोश, संपा. प्रभा गणोरकर व इतर, ग. रा. भटकळ फाउण्डेशन, मुंबई, २००१.
२) मराठी वाङ्मयकोश खंड चौथा समीक्षा-संज्ञा, समन्वयक संपादक विजया राजाध्यक्ष, म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.
३) मराठी कविता : स्वरूप आणि विवेचन, प्रा. निशिकांत ठकार, स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन, पुणे.
४) कविता आणि प्रतिमा, सुधीर रसाळ
५) आधुनिक मराठी काव्याचे अंत:प्रवाह, वा. भा. पाठक, श्री लेखन वाचन भांडार, पुणे.
६) तीन मार्क्सवादी कवी, स. त्र्यं. कुल्ली, लोकवाङ्मय गृह, मुंबई.
७) नारायण सुर्वे यांची कविता, मनोज तायडे, सुगावा प्रकाशन, पुणे.
८) अर्वाचीन कवींचा काव्यविचार, डॉ. हेमंत खडके, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
९) मराठी वाङ्मयाचा इतिहास (खंड ७, भाग २), संपा. प्रा. रा. ग. जाधव, महाराष्ट्र राज्य साहित्य परिषद, पुणे.

## ५) अभ्यासपत्रिका (MS25)

## विशेष वाङ्मयप्रकार चरित्र-आत्मचरित्र-आत्मकथन

**अभ्यासपत्रिकेची निष्पत्ती (COs)**

१. चरित्र्यविषय असलेल्या थोर व्यक्तींच्या जीवनकार्यातून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल.
२. संकटावर मात करूनही जीवनात यशस्वी होता येते, हा विचार दृढ होईल.
३. व्यावसायिक चरित्रलेखक होण्यासाठी अभ्यास उपयोगी ठरेल.
४. व्यावसायिक संपादक होण्यासाठी या अभ्यासाचा उपयोग होईल.
५. स्वत:चे जीवन व भोवतालचे समाजविश्व लेखनातून मांडता येईल.

| अक्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक | नेमलेले तास |
|---|---|---|
| १ | चरित्र-आत्मचरित्र-आत्मकथन : संकल्पना, स्वरूप आणि वैशिष्ट्ये | १५ तास |
| २ | नेमलेल्या साहित्यकृतींचा अभ्यास -<br>लोकनेते डॉ. पंजाबराव देशमुख, नीतीन रिंढे, गंधर्ववेद प्रकाशन, पुणे. | १५ तास |
| ३ | रामनगरी, राम नगरकर, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई. | १५ तास |
| ४ | भुरा, शरद बाविस्कर, लोकवाङ्मय गृह, मुंबई. | १५ तास |

संदर्भग्रंथ :

१) वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोश, संपा. प्रभा गणोरकर व इतर, ग. रा. भटकळ फाउण्डेशन, मुंबई, २००१.
२) मराठी वाङ्मयकोश खंड चौथा समीक्षा-संज्ञा, समन्वयक संपादक विजया राजाध्यक्ष, म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.
३) आत्मचरित्र मीमांसा, आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
४) मराठी वाङ्मयाचा इतिहास (खंड ७, भाग ४), संपा. प्रा. रा. ग. जाधव, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.
५) आधुनिक मराठी वाङ्मयातील स्त्रियांची आत्मचरित्रे : एक अभ्यास, डॉ. विमल भालेराव, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, १९८६.
६) नवे साहित्य नवे आकलन, डॉ. वासुदेव मुलाटे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.
७) स्त्रियांच्या आत्मचरित्रातील सामाजिक संदर्भ, डॉ. नीला कोंडोलीकर, नभ प्रकाशन, अमरावती, २०१२.

## ६) अभ्यासपत्रिका (MS26)

## विशेष वाङ्मयप्रकार ललित गद्य

**अभ्यासपत्रिकेची निष्पत्ती (COs)**

१. ललित गद्य वाङ्मयप्रकाराच्या संकल्पनेचे ज्ञान होऊन या वाङ्मयप्रकाराच्या वेगळेपणाची जाणीव होईल.
२. ललित गद्यकृतींच्या वाचनातून आनंद, बोध, ज्ञान इत्यादींची प्राप्ती होऊन जीवनविषयक जाणीव समृद्ध होईल.
३. काव्यात्मता, वैचारिकता, तात्त्विकता, भावनात्मकता, सामान्य गोष्टींतील असामान्यत्वाचे दर्शन इत्यादी ललित गद्याची वैशिष्ट विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन संपन्न करेल.
४. ललित गद्य साहित्यकृतींच्या अभ्यासाने विद्यार्थी भाषाकौशल्ये आत्मसात करू शकतील.
५. ललित गद्याच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांना वाङ्मयनिर्मितीसाठी प्रेरणा मिळेल तसेच लेखक होण्यासाठी ललित गद्यलेखन करणे विद्यार्थ्यांना उपयोगी ठरेल.

| अक्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक | नेमलेले तास |
|---|---|---|
| १ | ललित गद्य : संकल्पना, स्वरूप आणि वैशिष्ट्ये | १५ तास |
| २ | नेमलेल्या साहित्यकृतींचा अभ्यास -<br>प्रातिनिधिक लघुनिबंध संग्रह, संपा. के. ज. पुरोहित, साहित्य अकादेमी, नवी दिल्ली. | १५ तास |
| ३ | रंगरेषा, शांता शेळके, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. | १५ तास |
| ४ | ऋतू बरवा, विश्वास वसेकर, साधना प्रकाशन, पुणे, २०२०. | १५ तास |

संदर्भग्रंथ :

१) मराठी विश्वकोश, खंड १५वा.
२) वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोश, संपा. प्रभा गणोरकर व इतर, ग. रा. भटकळ फाउण्डेशन, मुंबई, २००१.
३) मराठी वाङ्मयकोश खंड चौथा समीक्षा-संज्ञा, समन्वयक संपादक विजया राजाध्यक्ष, म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.
४) मराठी लघुनिबंधाचा इतिहास, डॉ. आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
५) मराठी गद्य : पूर्वपीठिका आणि निबंध, डॉ. हरिश्चंद्र थोरात, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.

## ७) अभ्यासपत्रिका (MS27)

## विनोदी साहित्य

**अभ्यासपत्रिकेची निष्पत्ती (COs)**

१. विनोदाची संकल्पना स्पष्ट होऊन विद्यार्थ्यांना विनोदाचे मानवी जीवनातील महत्त्व लक्षात येईल.
२. मराठीतील विनोदी साहित्याची परंपरा कळेल.
३. मराठीतील विनोदी साहित्याचे स्वरूपविशेष लक्षात येतील.
४. या अभ्यासपत्रिकेमुळे प्रत्यक्ष जीवनाकडे तसेच आजूबाजूला घडणाऱ्या घटनाप्रसंगांकडे बघण्याची स्वतंत्र दृष्टी प्राप्त होऊन विद्यार्थी विनोदलेखनास प्रवृत्त होतील.
५. कौशल्यविकास करता येईल.

| अक्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक | नेमलेले तास |
|---|---|---|
| १ | विनोदी साहित्य : संकल्पना, स्वरूप आणि वैशिष्ट्ये<br>मराठीतील विनोदी साहित्याची परंपरा | १५ तास |
| २ | नेमलेल्या साहित्यकृतींचा अभ्यास -<br>चिमणरावांचे चऱ्हाट, चि. वि. जोशी | १५ तास |
| ३ | साष्टांग नमस्कार, प्र. के. अत्रे, | १५ तास |
| ४ | गोळाबेरीज, पु. ल. देशपांडे, मौज प्रकाशन, मुंबई. | १५ तास |

संदर्भग्रंथ :

१) मराठी वाङ्मयकोश, खंड ४, समीक्षा-संज्ञा, समन्वयक संपादक विजया राज्याध्यक्ष, म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.
२) विनोद : तत्त्व आणि स्वरूप, गो. म. पवार, मौज प्रकाशन गृह, मुंबई २००६.
३) हास्यविनोदमीमांसा, न. चिं. केळकर, कॉटिनेन्टल प्रकाशन, पुणे.
४) विनोद तत्त्वज्ञान, बाळ गाडगीळ, दिलीपराज प्रकाशन, पुणे, १९९३.
५) मराठी विनोद, उषा दा. कुलकर्णी, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
६) वाचत सुटलो त्याची गोष्ट, निरंजन घाटे, समकालीन प्रकाशन.

## ८) अभ्यासपत्रिका (MS28)

## प्रवासवर्णन

**अभ्यासपत्रिकेची निष्पत्ती (COs)**

१. प्रवासवर्णन या वाङ्मयप्रकाराची संकल्पना स्पष्ट होऊन त्याचे वर्तमानकालीन महत्त्व कळेल.
२. मराठी प्रवासवर्णनपर लेखनाच्या वाचनातून विद्यार्थ्यांना विविध संस्कृती, प्रदेश आणि तेथील जनजीवन, परंपरा इत्यादींची माहिती होऊन ज्ञानात भर पडेल.
३. या अभ्यासपत्रिकेमुळे प्रत्यक्ष प्रवासाकडे बघण्याची स्वतंत्र दृष्टी प्राप्त होऊन, जीवन समजून घेण्यासाठी विद्यार्थी प्रवासास उद्युक्त होतील.
४. प्रवासाशी संबंधित उद्योग जगत आणि त्यातील संधींची माहिती मिळाल्याने त्या दृष्टीने आवश्यक स्वत:चा कौशल्यविकास करता येईल.
५. या पत्रिकेमुळे विद्यार्थी प्रवास, पर्यटन या विषयीचे स्वतंत्र लेखन करून रोजगारक्षम बनू शकतील.

| अक्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक | नेमलेले तास |
|---|---|---|
| १ | प्रवासवर्णन : संकल्पना, स्वरूप आणि वैशिष्ट्ये | १५ तास |
| २ | नेमलेल्या साहित्यकृतींचा अभ्यास -<br>पांढरी मेंढरे हिरवी कुरणे, व्यंकटेश माडगूळकर, उत्कर्ष प्रकाशन, पुणे. | १५ तास |
| ३ | पूर्वरंग, पु. ल. देशपांडे, श्री विद्या प्रकाशन, पुणे. | १५ तास |
| ४ | माझं लंडन, मीना प्रभू, पुरंदरे प्रकाशन, पुणे. | १५ तास |

संदर्भग्रंथ :

१) मराठी वाङ्मयकोश, खंड ४, समीक्षा-संज्ञा, समन्वयक संपादक विजया राज्याध्यक्ष, म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.
२) प्रवासवर्णन : एक वाङ्मयप्रकार.
३) प्रवासवर्णनांचा प्रवास, मुकुंद वझे, देशमुख आणि कंपनी, पुणे, २०१६.

## ९) अभ्यासपत्रिका (MS29)

**DSC-II.2 –Tutorial** प्रशिक्षण व कार्यानुभव

| अक्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक (अध्यापन / प्रशिक्षण) | कृती | नेमलेले तास |
|---|---|---|---|
| १ | समीक्षाप्रक्रिया - पुस्तकपरीक्षण | पुस्तकपरीक्षण करणे. | १० तास |
| २ | समीक्षाप्रक्रिया - कवितेचे रसग्रहण | वेगवेगळ्या आशयाच्या कवितांचे रसग्रहण करणे. | १० तास |
| ३ | आस्वादक समीक्षा / समाजशास्त्रीय समीक्षा / चरित्रात्मक समीक्षा | कोणत्याही एका पद्धतीने वाङ्मयकृतीचे समीक्षण करणे. | १० तास |

अंतर्गत परीक्षा स्वरूप

| अक्र. | लेखी - स्वाध्याय / प्रकल्प / निबंध | मौखिक परीक्षा / सादरीकरण | एकूण गुण |
|---|---|---|---|
| १ | २५ | २५ | ५० |

❄ ❄ ❄

**On Job Training, Internship/ Apprenticeship, Field projects:**

| अक्र. | प्रकार | स्वरूप | तास | श्रेयांक |
|---|---|---|---|---|
| १ | सेवाधीन प्रशिक्षण (**On Job Training**),<br><br>सेवानुभव (**Internship/ Apprenticeship**) | ३) विविध संस्था-कार्यालयांमध्ये उदा. वृत्तपत्रे, आकाशवाणी, टीव्ही चॅनेल्स, माहिती कार्यालय, जनसंपर्क कार्यालय, प्रकाशन संस्था, साहित्यविषयक कार्य करणाऱ्या संस्था इ. ठिकाणी मराठीविषयक लेखनाची सेवा देणे किंवा लेखन-संपादन इत्यादी विषयक कार्यानुभव घेणे.<br>४) विविध ग्रंथालयांसाठी, संशोधनमंडळांसाठी किंवा अध्यासनांसाठी ग्रंथसूची / लेखसूची अशा प्रकारचा कार्यानुभव घेणे इत्यादी.<br>५) साहित्यिकासाठी लेखनिक म्हणून कार्य करणे.<br>६) अभ्यासकांसाठी अभिवाचक म्हणून सेवा देणे.<br>७) भाषांतरप्रक्रियेत सहभाग घेणे.<br>८) मजकूराचे संगणकीकरण कार्यात सेवा देणे. | १२० | ४ |
| | क्षेत्रप्रकल्प (**Field Projects**) | साहित्यविषयक अभ्यासपत्रिकांच्या अनुषंगाने क्षेत्रप्रकल्प पूर्ण करता येईल. उदा.<br>१) विशिष्ट बोलीचे स्वरूप उदा. वऱ्हाडी बोली<br>२) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मराठी भाषेच्या क्षमतेची पाहणी.<br>३) वऱ्हाडी म्हणी व वाक्प्रचार<br>४) मराठीवरील इंग्रजी किंवा अन्य भाषेचा परिणाम<br>५) परिसरातील सत्यशोधकी साहित्य इत्यादी.<br>६) परिसरातील मराठी लेखक व त्यांचे साहित्य<br>७) लोककथा, लोकगीते यांचे संकलन.<br>८) लोकदैवते, लोकविधी यांच्या नोंदी.<br>९) परिसरातील वाङ्मयीन संस्कृती - संमेलने/उपक्रम यांचे दस्तऐवजीकरण.<br>१०) वार्षिक प्रकाशित साहित्य - कोश / सूची | | |

सत्र १ आणि सत्र २ सुट्टीच्या कालावधीत एकूण १२० तास अभ्यासक्रमाशी संबंधित सेवाधीन प्रशिक्षण, सेवानुभव, क्षेत्रप्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक राहील. हे कार्य पूर्ण झाल्यानंतर त्याचे ४ श्रेयांक विद्यार्थ्यास मिळतील.

❄ ❄ ❄

**लेखी परीक्षा - प्रश्नपत्रिकेचे स्वरूप**

| | |
|---|---|
| **लेखी परीक्षा - प्रश्नपत्रिकेचे स्वरूप आणि अंतर्गत परीक्षेचे स्वरूप** (सत्र २) | ❖ प्रत्येक अभ्यासपत्रिका १०० गुणांसाठी असेल.<br>❖ अभ्यासपत्रिकेच्या १०० गुणांचे विभाजन पुढीलप्रमाणे राहील<br>आ) ७० गुणांसाठी लेखी परीक्षा<br>ब) ३० गुणांसाठी अंतर्गत परीक्षा<br>❖ लेखी परीक्षेचे स्वरूप - प्रश्नपत्रिका एकूण ७० गुण<br>आ) दीर्घोत्तरी प्रश्न - ५६ गुण<br>(१४ गुणांचा एक याप्रमाणे ४ दीर्घोत्तरी प्रश्न (पर्यायासह) राहतील.)<br>ब) वस्तुनिष्ठ प्रश्न - १४ गुण<br>(२ गुणांचा एक याप्रमाणे ७ वस्तुनिष्ठ प्रश्न)<br>❖ अंतर्गत परीक्षेचे स्वरूप - एकूण गुण ३०<br>९) अंतर्गत परीक्षेसाठी विषयानुरूप शोधनिबंध / लघुशोधप्रकल्प / कोशनोंद-लेखन किंवा विकिपिडियासाठी लेखन / सूचीनिर्मिती / ब्लॉगनिर्मिती / मुलाखत / सर्वेक्षण इत्यादी प्रकारचे कार्य सत्रकालावधीत पूर्ण करणे अपेक्षित राहील. - गुण १५<br>१०) विषयानुरूप मौखिक परीक्षा / सादरीकरण आवश्यक राहील. - गुण १५ |

❄ ❄ ❄